# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ.

**(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IES: २७००१-२०१३)**

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१५१ / १५२

Email : secretary@msbte.com Web : www.msbte.org.in


जा.क्र.मरातंशिमं/का-५०/संधी/२०२१/ 6950 दिनांक: 27 OCT 2021

प्रति,
प्राचार्य,
औषधनिर्माण शास्त्र (PH) हा पदविका अभ्यासक्रम
राबविणाऱ्या मंडळाशी संलग्न सर्व संस्था

**विषय:- D.Pharm अभ्यासक्रमातील "S" Scheme च्या व्दितीय वर्ष प्रवेशास अपात्र विदयार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये दुस-या वर्षाचे सत्र पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी उपलब्ध करून देण्याबाबत.**

**संदर्भ:-** १. Pharmacy Council of India यांचे दि.२३.०९.२०२१ रोजीचे पत्र क्र. 14-55-2021-PCI(A) / 3642-45

२. मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावली मधील नमूद नियम RG 7C

उपरोक्त संदर्भ क्र. १ नुसार Pharmacy Council of India नवी दिल्ली व्दारे औषधनिर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून लागू करण्यात आलेल्या सुधारीत पाठ्यक्रमास **महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने 'J' Scheme म्हणून राबविण्यास सुरूवात केली आहे**. त्यामुळे औषधनिर्माण शास्त्र पदविका व्दितीय वर्षासाठी "S - Scheme" चे अभ्यासक्रम राबविण्यासाठीचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ हे अंतिम वर्ष राहिल.

ज्या विद्यार्थ्यांनी पदविका फार्मसी S-Scheme च्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे व त्यांचा उन्हाळी परिक्षा २०२१ पर्यंत प्रथम वर्षाचा निकाल Fail असून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता व्दितीय वर्षात प्रवेश घेण्यास अपात्र आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी दुस-या वर्षाचे सत्र पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी (One Time Opportunity) खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१. सदरची संधी केवळ व्दितीय वर्षाचे सत्र पूर्ण करून घेण्यासाठीच आहे.
२. सदर संधी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी प्राचार्य यांनी स्वत: विद्यार्थ्यांना/पालकांना याबाबत संपूर्ण मार्गदर्शन करावे.
३. सदर संधीचा लाभ घेणा-या विदयार्थ्यांनी हिवाळी परीक्षा २०२१ मध्ये प्रथम वर्षाच्या Backlog विषयांमध्ये उत्तीर्ण होऊन मंडळाच्या परिक्षा विषयक नियमावलीनुसार व्दितीय वर्षात प्रवेशास पात्र होतील असेच विदयार्थी उन्हाळी परीक्षा २०२२ पासुन व्दितीय वर्षाची परीक्षा देण्यास पात्र राहतील. अन्यथा विदयार्थी ज्या वेळी व्दितीय वर्षाच्या प्रवेशास पात्र ठरतील तेव्हा ते पुढील परिक्षा देण्यासाठी पात्र राहतील.
४. एकवेळ संधी साठी पात्र विद्यार्थ्यांची यादी संस्थेच्या Log-in मध्ये उपलब्ध केली जाईल. संस्थेने एक वेळ संधी घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांचे मंडळाच्या Online प्रणालीद्वारे Registration करणे बंधनकारक राहिल.
५. एक वेळ संधीचा लाभ घेऊ इच्छिणा-या विदयार्थ्यांनी अर्जाचा नमुना १ प्रमाणे सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांना अर्ज सादर करून सदर अर्जाच्या प्रक्रियेसाठी शुल्क रू.१००/- संस्थेत जमा करणे बंधनकारक राहिल. संस्था स्तरावर विदयार्थ्यांचे अर्ज स्वीकारून त्यांची छाननी करून सदर अर्जातील घोषणा पत्र पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील.

६. अर्ज नमुना १ मध्ये अर्ज सादर करण्या-या सर्व विदयार्थ्यांनी नमूना २ मधील हमी पत्र अर्जा सोबत सादर करणे बंधनकारक राहिल.
७. एक वेळ संधी साठी अर्ज सादर केलेल्या संस्थेतील सर्व विदयार्थ्यींची माहिती नमुना ३ मधील हमीपत्रात भरुन मंडळाच्या संबंधीत विभागीय कार्यालयाकडे संस्थेतर्फे सादर करणे बंधनकारक राहिल.
८. सर्व विदयार्थ्यांचे अर्ज, हमीपत्र यांचे Scancopy मंडळाच्या परिक्षा विभागाच्या निर्देशानुसार सादर करणे बंधनकारक राहिल.
९. विभागीय कार्यालयामार्फत निश्चित (confirm) झालेल्या Online Registration मधील विद्यार्थ्यांनाच एकवेळ संधी देण्यात येईल. याबाबतचे सविस्तर परिपत्रक परिक्षा विभागामार्फत देण्यात येईल.
१०. या विद्यार्थ्यांचे सत्रकर्म पूर्ण करुन घेण्याची पूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.
११. एकवेळ संधीचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांचे मंडळाच्या नियमानुसार अर्ज अभिलेखे (Record) ठेवणेची जबाबदारी संस्थेची आहे. तसेच असे रेकॉर्ड आवश्यकतेनुसार सादर केले जाईल असे हमीपत्र संस्थेने देणे आवश्यक आहे.
१२. ज्या विद्यार्थ्यांनी सत्र पूर्ण केलेले आहे त्यांनी संबंधीत विषयाचे Practical Record/ Synopsis जतन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. परिक्षेत पात्र झाल्यावर Oral/Practical परिक्षेचे वेळी सदर Practical Record/ Synopsis सादर करण्याची जबाबदारी सदर विद्यार्थ्याची राहील.

सहपत्र - १) अर्जाचा नमुना - १
२) बंधपत्र नमुना - २
३) बंधपत्र नमुना - ३

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत.

१. मा. संचालक, म.रा.तं.शि.मंडळ, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
२. उपसचिव, परीक्षा विभाग, म.रा.तं.शि.मंडळ, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
३. उपसचिव, प्रश्नपत्रिका विभाग, म.रा.तं.शि.मंडळ, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
४. उपसचिव म.रा.तं.शि.मंडळ, मुंबई, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद यांना आवश्यक कार्यवाहीकरीता.

# अर्जाचा नमुना

प्रति,
माननीय सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
मुंबई.
(मार्फत – संस्थाप्रमुख)

**विषय:- D.Pharm अभ्यासक्रमातील "S" Scheme च्या व्दितीय वर्ष प्रवेशास अपात्र विदयार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये दुस-या वर्षाच्या सत्र पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी उपलब्ध करून देण्याबाबत.**

**संदर्भ :-** मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावली मधील नमूद नियम RG 7-C.

उपरोक्त संदर्भान्वये व विषयानुषंगाने व्दितीय वर्षाचे सत्रकर्म (Term Work) पूर्ण करण्याची परवानगी मिळण्याकरिता मी, खाली सही करणार (विद्यार्थी) अर्ज सादर करीत आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षा नियम **RG 6** नुसार मी व्दितीय वर्षात प्रवेश घेण्यास अपात्र आहे. तथापी उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये, केवळ सत्रकर्म (Term Work) पूर्ण करण्यास संधी देण्यात आली असून मी ............................................................ पदविका अभ्यासक्रमाच्या व्दितीय वर्षात प्रवेश घेऊन **'S' Scheme** प्रमाणे सत्रकर्म पूर्ण करू इच्छितो/इच्छिते. त्या करिता मला परवानगी द्यावी ही विनंती.

मंडळाच्या परिक्षा नियमानुसार पात्र होईन तेव्हाच मला परिक्षेस बसण्याची संधी मिळेल, याबाबत मला संस्थेने जाणीव करून दिलेली आहे. तसेच सत्रकर्म (Term Work) पूर्ण करण्याबाबत मंडळाच्या परिक्षा नियमावलीतील नियम RG 6 मला बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे. तसेच यासोबत बंधपत्र सादर करावयाचे आहे, याची मला जाणीव असून बंधपत्रातील सर्व बाबी मला मान्य आहेत.

व्दितीय वर्षाचे सत्रकर्म (Term Work) पूर्ण करण्याची संधी मला द्यावी, ही विनंती.

आपला/आपली विश्वासू

दिनांक-
स्थळ-

सही-
नांव -
नोंदणी क्र. -

## घोषणा पत्र

मी घोषित करतो/करते की, विद्यार्थ्यास संपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले असून सर्व संबंधित नियमांची (RG ६) माहिती करून देण्यात आली आहे. विद्यार्थी संधीचा लाभ घेण्यास उत्सुक आहे. त्या करिता त्याचा अर्ज सादर करीत आहे. तसेच ही संधी घेणाऱ्या विद्यार्थ्याचे अर्ज अभिलेखे (Record) ठेवणेची जबाबदारी संस्था घेत आहे. तसेच आवश्यकतेप्रमाणे ते मागणी केल्यास उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

संस्थेचा
शिक्का

सही
प्राचार्यांचे नांव-
संस्थेचे नाव -

**नमूना - २**

## UNDERTAKING

## विद्यार्थ्याने संस्थेत द्यावयाचे हमीपत्र

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये व्दितीय वर्ष S- Scheme च्या अभ्यासक्रमांत सत्र पूर्ण करण्याची संधी ..............................**

**संदर्भ :- म.रा.तं.शि.मं. परिपत्रक जा.क्र. मरातशिमं/का-५०/संधी/२०२१ दि. ..................**

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये तथा विषयानुषंगाने मी खालीलप्रमाणे बंधपत्र सादर करीत आहे.

१. सदरची संधी मी स्वेच्छेने स्विकारीत आहे.
२. माझा व्दितीय वर्षातील प्रवेश केवळ सत्रकर्म (Term Work) पूर्ण करण्याकरीता आहे व परीक्षा नियमानुसार मी परीक्षेस बसण्यास जेव्हा पात्र होईन तेव्हाच मला परीक्षा देता येईल.
३. हिवाळी परिक्षा २०२१ मध्ये मागील वर्षाच्या विषयांत मी उत्तीर्ण झाल्यास व मंडळाच्या परिक्षा विषयक नियमावलीनुसार व्दितीय वर्षात प्रवेशास पात्र झाल्यास तसेच व्दितीय वर्षाचे सत्रकर्म (Term Work) मी नियमानुसार पूर्ण केल्यास उन्हाळी परीक्षा २०२२ मध्ये मी व्दितीय वर्षाची परीक्षा देण्यास पात्र होईन.
४. निर्धारीत कालावधीत मी पदविका पूर्ण करू शकलो/ शकले नाही तर मला मंडळाने घोषित केलेल्या समकक्ष विषयांची परीक्षा द्यावी लागेल.
५. मी संस्थेमध्ये आवश्यक ती शिस्त पाळेन. संस्थेच्या शिस्तीला बाधा येईल असे कोणतेही वर्तन करणार नाही.
६. माझ्या हातुन नियमीत विद्यार्थ्यांना त्रास होईल असे कोणतेही वर्तन होणार नाही जेणेकरून संस्थेच्या शिस्तीचा/नियमांचा भंग होईल असे मी केल्यास माझी ही संधी रद्द केली जाईल याची मला जाणीव आहे.
७. एकवेळ संधीची सुविधा घेत असताना भविष्यात माझा निकाल RHR राहणेची शक्यता आहे, याची मला कल्पना आहे. त्याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

सही -

विद्यार्थ्याचे पूर्ण नांव -
नोंदणी क्र. -
अभ्यासक्रम -

स्थळ :-
दिनांक :-

साक्षीदाराची सही :-
साक्षीदाराचे नांव :-

## नमूना - ३

## UNDERTAKING

### संस्था प्रमुखांनी विभागीय कार्यालयाकडे सादर करावयाच्या हमीपत्राचा नमुना

**विषय : D.Pharm अभ्यासक्रमातील "S" Scheme च्या व्दितीय वर्ष प्रवेशास अपात्र विदयार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये दुस-या वर्षाचे सत्र पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी उपलब्ध करून देण्याबाबत.**

**संदर्भ** : मंडळाचे परिपत्रक क्र. MSBTE/D-५०/संधी/२०२१/ दिनांक :

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मंडळाने संदर्भात नमुद केलेल्या परिपत्रकानुसार आमच्या संस्थेतील खालील तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये व्दितीय वर्षासाठी एक वेळ संधी अंतर्गत (One Time Opportunity) शिक्षण घेण्याचा विकल्प सादर केलेला आहे. तो खालील तक्त्यात दर्शविला आहे.

| अ.क्र. | नोंदणी क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | अभ्यासक्रम | एक वेळ संधीचा लाभ घेताना विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्षनिहाय सत्रनिहाय पूर्वइतिहास |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

मी, ______________________ प्राचार्य, ______________________

खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करीत आहे.

१. वरील तक्त्यामधील नमुद सर्व विद्यार्थी व्दितीय वर्षाच्या परिक्षांसाठी पात्र होईपर्यंत तथा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत, त्यांचे या शैक्षणिक वर्षातील सेशनल/टर्मवर्क/प्रात्यक्षिकांचे सी आय अे अे एन मधील नमुद निकषांप्रमाणे विषयनिहाय दस्तऐवज संस्था विहित पध्दतीने जतन करेल.

२. वरील तक्त्यामधील नमुद विद्यार्थी व्दितीय वर्षाच्या परीक्षांसाठी ज्याप्रमाणे पात्र होतील आणि विद्यार्थी ज्यावेळी त्या त्या वर्षाच्या प्रथम संधीच्या परीक्षेस बसतील त्याप्रमाणे त्यांचे सदर सेशनलचे आणि विषयनिहाय टर्मवर्क, प्रात्यक्षिक या उपविषयशीर्षांचे गुण अचूकतेने 'S' Scheme मार्कशीटद्वारे संस्था मंडळाकडे सादर करेल.

३. एक वेळ संधी अंतर्गत जे विद्यार्थी व्दितीय वर्षाच्या परीक्षांस पात्रतेप्रमाणे बसतील तेव्हा त्यांचे सर्व विषयांच्या अंतर्गत मुल्यांकनाचे गुण विहित पध्दतीने सादर करण्याची व तसे सादर न केल्याने विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर राहिल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी माझेवर राहील.

स्थळः

दिनांक :

संस्थेचा शिक्का

स्वाक्षरीः-
प्राचार्यांचे नावः-
संस्थेचे नावः-